# मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प

## प्रकल्प अंमलबजावणी कक्षांकरिता

# सामाजिक व्यवस्थापन आराखडा अंमलबजावणी मार्गदर्शिका

प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष

२७०, शेतीमहामंडळ भवन,

भांबुर्डा, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ०१६

# सामाजिक व्यवस्थापन आराखडा - अंमलबजावणी मार्गदर्शिका

सामाजिक व्यवस्थापन आराखडयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता सर्व प्रकल्प अंमलबजावणी कक्षाकरीता मार्गदर्शिका तयार करण्यात आली आहे. ही मार्गदर्शिका प्रामुख्याने खालीलप्रमाणे दोन प्रमुख भागामध्ये विभागलेली आहे.

१) सामाजिक व्यवस्थापन आराखडयाचे प्रमुख घटक

२) प्रकल्पाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर घटकनिहाय प्रकल्प अंमलबजावणी कक्षांने करावयाची कार्यवाही

प्रकल्पाच्या विविध घटकांची अंमलबजावणी करत असताना त्याचा विविध सामाजिक घटकावर विपरीत परिणाम होणार नाही, अथवा तो झालाच, तर तो परिणाम कमी करणे यासाठी प्रकल्पामार्फत सामाजिक व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे. सामाजिक व्यवस्थापन आराखडयाचे खालीलप्रमाणे पाच प्रमुख घटक आहेत.

१) **प्रकल्पात विविध सामाजिक प्रवर्गांचा समावेश** (Social Inclusion)

२) **जागतिक बँक धोरण** (World Bank Policies)

   २.१ आदिवासी विकास आराखडा (Tribal Development Plan )

   २.२ अनैच्छिक पुनर्वसन (Involuntary Resettlement )

३) **कामगार आरोग्य व सुरक्षा** (Labour Health & Safety)

४) **तक्रार निवारण व्यवस्थापन** (Grievance Redressal Mechanism)

५) **जेन्डर स्ट्रॅटजी**

उपरोक्त नमूद प्रत्येक घटकांची माहिती व त्या अनुषंगाने प्रकल्पात करावयाची कामे व घ्यावयाची काळजी याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**१) प्रकल्पात विविध सामाजिक प्रवर्गांचा समावेश :**

प्रकल्पाचा लाभ घेणाऱ्या एकूण लाभार्थ्यांपैकी प्रकल्पाअखेर साध्य करावयाच्या विविध सामाजिक प्रवर्गाचे उद्दिष्ट खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| अ. | अत्य व अत्यल्प भूधारक शेतकरी | - ८० % |
| आ. | महिला भागधारक | - किमान ३०% |
| इ. | अनुसूचित जाती | - किमान ७% |
| ई. | अनुसूचित जमाती | - किमान ६% |
| उ. | महिला संचालक | - किमान २० % |

- प्रकल्पातील उत्पादक भागीदारी उपप्रकल्प, बाजार संपर्क वाढ उपप्रकल्प, पूरक व नावीन्यपूर्ण गुंतवणूक उपप्रकल्प व गोदाम पावती उपप्रकल्प राबविणाऱ्या सर्व समुदाय आधारित संस्थांनी हे उद्दिष्ट पूर्ण करणे अनिवार्य आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती चे उद्दिष्ट संबंधीत जिल्ह्याच्या प्रमाणानुसार ग्राह्य धरण्यात यावे. सर्व समुदाय आधारित संस्थांनी हे उद्दिष्ट पूर्ण केल्याशिवाय त्यांना अनुदानाचा तिसरा हप्ता प्रकल्पामार्फत देय राहणार नाही.

- तसेच प्रकल्पाच्या  इतर उपक्रमामध्ये जसे की, मूल्यसाखळी विकास शाळा, स्मार्ट कॉटन, प्रशिक्षण, अभ्यासदौरे, प्रात्यक्षिके, निविष्ठा वाटप, सर्टिफिकेशन, गोदाम पावती, Outreach/Awareness, प्रगतीशील शेतकऱ्यांची विविध उपक्रमाकरिता निवड इ. विविध प्रवर्गांचे उपरोक्तप्रमाणे (अ, आ, इ, ई ) उद्दिष्ट संबंधीत प्रकल्प अंमलबजावणी कक्षाने पूर्ण करणे अनिवार्य आहे.

**२) प्रकल्पास लागू असणारे जागतिक बँकेचे धोरण :**

प्रकल्पाच्या विविध उपक्रमामुळे कोणतीही सामाजिक हानी होवू नये याकरीता जागतिक बँकेचे खालीलप्रमाणे दोन धोरणे प्रकल्पाला लागू आहेत. ह्या दोन धोरणांच्या अनुषंगाने प्रकल्प राबवित असताना काळजी घेणे बंधनकारक आहे. सदर धोरणांची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करावयाची आहे

**२.१ आदिवासी विकास आराखडा**: हे धोरण  अनुसूचित भागांतर्गत येणाऱ्या १३ जिल्ह्यांना (पालघर, ठाणे, जळगाव, नाशिक, धुळे, अमरावती, यवतमाळ, नांदेड, नंदुरबार, गडचिरोली, चंद्रपूर, पुणे व अहमदनगर) लागू आहे. सदर जिल्ह्यांतर्गत अंशतः व संपूर्ण आदिवासी असणाऱ्या तालुक्यांची यादी प्रपत्र १  मध्ये जोडली आहे.  सदर जिल्ह्यातील आदिवासी तालुक्यातून सादर होणाऱ्या सविस्तर प्रकल्प अहवालात खालील बाबींची पूर्तता करणे गरजेचे आहे.

१. पेसा [पंचायत (अनुसूचित क्षेत्र विस्तार) अधिनियम १९९६][1] गावांमध्ये, पूर्वसूचना देवून आदिवासी समूहाबरोबर मोफत सल्लामसलत करुन त्यांचे मत विचारात घेवून उपप्रकल्प तयार करणे. याबाबतचे इतिवृत्त सविस्तर प्रकल्प अहवालात समाविष्ट करणे.

२. ज्या पेसा गावात पायाभूत सुविधेची उभारणी होणार आहे त्या गावात सदर प्रकल्प राबविण्याकरीता ग्रामसभेची मान्यता घेणे व याबाबतचे इतिवृत्त सविस्तर प्रकल्प अहवालात समाविष्ट करावे. याबाबतचा नमूना प्रपत्र -२ मध्ये जोडला आहे.

३.  प्रकल्पाच्या विविध उपक्रमांचा आदिवासी समूहावर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेणे- उपप्रकल्पातील उपक्रमामुळे आदिवासी समुदायाच्या रूढी, परंपरा, सामाजिक संस्कृती तसेच उदरनिर्वाह व जीवनमान प्रणालीवर विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी घेणे.

४. आदिवासी समुदायाला प्रकल्पाच्या विविध उपक्रमांचे फायदे इतर घटकांबरोबर मिळतील याची खातरजमा करणे.

५. सविस्तर प्रकल्प अहवालात आदिवासी समुदायांची विशिष्ट परिस्थिती लक्षात घेवून पायाभूत सुविधेसोबत त्यांच्या गरजेनुसार विशेष उपक्रमांचा समावेश करणे, जेणे करून उपप्रकल्पांचे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता मदत होईल.

**२.२ अनैच्छिक पुर्नवसन**:

हे धोरण प्रकल्पांतर्गत उभारल्या जाणाऱ्या विविध पायाभूत सुविधेकरीता लागणाऱ्या जागेशी संबंधित आहे. यासंदर्भात प्रमुख गोष्टी खालीलप्रमाणे आहेत.

---

[1] हा कायदा अनुसूचित क्षेत्रातील आदिवाशी लोकांशी संबंधित असून आदिवाशींची संस्कृती, प्रथा, परंपरा यांचे जतन व संवर्धन करणे व ग्रामसभेच्या माध्यमातून आदिवाशींची स्वशासन व्यवस्था बळकट करणे हे पेसा या कायद्याचे प्रमुख सूत्र आहे.

- प्रकल्पामध्ये कोणत्याही पायाभूत सुविधा उभारणीसाठी जागा खरेदी करण्याकरीता अनुदान दिले जाणार नाही.
- प्रकल्पातील कामांमुळे लोकांचे विस्थापन/स्थलांतर किंवा त्यांचे पुर्नवसन अपेक्षित नाही. त्यामुळे प्रकल्पांतर्गत लागणाऱ्या सर्व जागा ह्या अतिक्रमणमुक्त असणे गरजेचे आहे. तरीदेखील एखादे काम हाती घेताना असा मुद्दा उपस्थित झालाच तर करावयाची उपाययोजना Environment and Social Management Framework (ESMF) अहवालामध्ये दिलेली आहे.
- प्रकल्प अंमलबजावणी कक्षांमार्फत वेगवेगळ्या घटकांतर्गत उभारण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा उभारणीकरीता लागणारी जागा ही संबंधीत प्रकल्प अंमलबजावणी कक्षाची स्वत:ची/भाडेत्तत्वावर असेल. सदर जागेवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण नाही ह्याची खातरजमा संबंधीत कक्षाने करणे गरजेचे आहे.
- सर्व उपप्रकल्पामध्ये सहभागी होणा-या प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा/समुदाय आधारीत संस्थांनी कोणत्याही उपक्रमाकरीता जमीन लागणार असल्यास त्या जमिनीचे कागदपत्र (७ /१२, ८ अ उतारा, २९ वर्षाचा दुय्यम निबंधकाकडे नोंदणीकृत भाडे करार, **जमिनीवर अतिक्रमण नसल्याचा संबंधित प्रकल्प अंमलबजावणी कक्षाच्या जिल्हा स्तरीय अधिकाऱ्यांचा दाखला** इ.) संपूर्ण प्रकल्प अहवालात समाविष्ट करणे आवश्यक आहे. संबंधीत जागेवर अतिक्रमण नसल्याचे नमूना प्रपत्र -३ मध्ये जोडले आहे.
- जागेचा भाडेकरार करताना तो करार, जागा मालक व प्रकल्प अंमलबजावणी कक्ष/समुदाय आधारित संस्था यांच्या संयुक्त संमतीने कुठल्याही दबावाशिवाय झाला आहे याची खातरजमा करणे व हा करार करताना किमान तीन साक्षीदार असणे गरजेचे आहे.

**३) कामगार आरोग्य व सुरक्षा:**

प्रकल्पांतर्गत वेगवेगळ्या घटकाअंतर्गत काम करण्याकरिता महिला व पुरुष कामगार लागणार आहेत. ह्या कामगांराना विविध कामगार कायद्यानुसार आरोग्य व सुरक्षिततेच्या सेवा पुरविणे हे संबंधीत समुदाय आधारित संस्थेला किंवा संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेला बंधनकारक आहे. याबाबत विविध कामांच्या अनुषंगाने कार्यप्रणाली खालीलप्रमाणे आहे.

**३.१ बांधकाम:**

प्रकल्पांतर्गत विविध पायाभूत सुविधांचे बांधकाम जसे की गोदाम, शीतगृहे, पॅक हाऊस, साठवणुकीकरीता शेड इ. प्रस्तावित आहे. सदर बांधकाम करण्याकरीता समुदाय आधारित संस्थेमार्फत कंत्राटदाराची नेमणूक केली जाणार आहे. हे करत असताना संबंधीत प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेने व समुदाय आधारित संस्थेने खालील गोष्टी करून घेण्याबाबत खातरजमा करणे अनिवार्य आहे.

क. बांधकामाकारीता देण्यात येणाऱ्या निविदेमध्ये ESHS COMPLIANCE FORM (ENVIRONMENT, SOCIAL , HEALTH & SAFETY ) चा समावेश करणे.

ख. PRE-BID मीटिंग मध्ये ESHS PLAN कसा भरायचा याबाबत कंत्राटदारांना मार्गदर्शन करणे.

ग. कंत्राटदारच्या करारामध्ये ESHS Plan चा समावेश करणे.

घ. ESHS Plan प्रमाणे कंत्राटदाराने आरोग्य व सुरक्षिततेबाबत सर्व सुविधा कामगारांना पुरविण्याबाबत पाठपुरावा करणे, सनियंत्रण करणे.

ङ. ESHS Plan मध्ये खालीलप्रमाणे आरोग्य व सुरक्षिततेच्या सोई सुविधांचा समावेश होऊ शकतो-

i. जर कामगार बाहेरून ( गाव/ तालुका/ जिल्हा/ राज्य बाहेरून ) उपलब्ध होत असतील तर त्यांची राहण्याची सोय (Camp Setup) करणे गरजेचे आहे. त्यामध्ये पुरेसा प्रकाश, हवा खेळती असणे गरजेचे आहे व राहण्याच्या अनुषंगाने सर्व मूलभूत सुविधा पुरविणे गरजेचे आहे.

ii. बाहेरगावाहून कामगार उपलब्ध होत असतील तर त्यांच्यामुळे गावामध्ये व्यसनाचे प्रमाण वाढणार नाही, भांडणे/दंगे होणार नाहीत, महिलांचे लैंगिक शोषण होणार नाही, गावाचे सामाजिक स्वास्थ बिघडणार नाही याकरीता प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे अनिवार्य आहे.

iii. कंत्राटदाराने सर्व कामगार कायद्यानुसार सुविधा पुरवणे बंधनकारक आहे.

iv. कामाच्या ठिकाणी आरोग्याच्या बाबतीत पिण्याचे स्वच्छ पाणी, महिला व पुरुषांकरीता स्वतंत्र स्वच्छतागृह, प्रथमोपचार पेटी इ. सेवा पुरविणे आवश्यक आहे

v. कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या अनुषंगाने सुरक्षात्मक साधने जसे कि हेल्मेट, Goggle, Gloves व इतर कामाच्या अनुषंगाने सुरक्षिततेची साधने पुरविणे आवश्यक आहे.

vi. कामगार कायद्यानुसार किमान रोजगार तसेच स्त्री व पुरुष कामगारांना समान कामांकरीता समान रोजगार देणे आवश्यक आहे.

vii. बालकामगार व वेठबिगार ठेवण्यास प्रतिबंध आहे.

viii. कामाच्या ठिकाणी कामगारांच्या तक्रारीचे निराकरण करण्याकरिता तक्रार निवारण व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

ix. बांधकामामुळे गावांमध्ये सामूहिक साधने जसे कि रस्ता बंद होणार नाही, प्रदूषण वाढणार नाही, पाण्याचा स्त्रोत गढूळ होणार नाही तसेच रहदारी वाढल्यामुळे गावात अपघात होणार नाही याकरीता उपाययोजना करणे आवश्यक आहे.

ESHS PLAN चा नमूना प्रपत्र ४ मध्ये जोडला आहे.

कंत्राटदाराने सर्व कामगारांचा तपशील ठेवणे गरजेचे आहे (जसे कि एकूण कामगार संख्या, महिला कामगार संख्या, पुरुष कामगार संख्या, दोघांचे एकूण कामाचे दिवस, कौशल्य आधारित काम करणारे कामगार, बिगार कौशल्य आधारित काम करणारे कामगार, एकूण स्त्री कामगांराचे मानधन, पुरूष कामगारांचे मानधन, पुरविण्यात आलेल्या आरोग्य व सुरक्षिततेच्या सुविधा इ). समुदाय आधारित संस्थेने जिल्हा अंमलबजावणी कक्षास सादर करावयाच्या माहितीचा नमूना प्रपत्र ५ मध्ये जोडला आहे.

३.२ उपप्रकल्प व्यवसाय अंमलबजावणी:-

उपप्रकल्पांतर्गत उभारण्यात आलेल्या पायाभूत सुविधेमध्ये ठेवण्यात येणा-या कामगारांच्या आरोग्य व सुरक्षिततेची काळजी घेणे बंधनकारक आहे. यामध्ये ३.१ मध्ये नमूद केलेल्या मुद्दा क्र. (iii ते viii) चा समावेश होतो. तसेच १० पेक्षा जास्त कामगार काम करत असतील तर कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध मनाई व निवारण) अधिनियम २०१३ अंतर्गत, अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करणे अनिवार्य आहे.

३.३ मूल्य साखळी विकास शाळा व स्मार्ट कॉटन:

सदर घटकांतर्गत प्रात्यक्षिके घेत असताना कामगारासंदर्भात खालील बाबींचे पालन करणे क्रमप्राप्त आहे.

- बालकामगारास प्रतिबंध
- वेठबिगारीस प्रतिबंध
- स्त्री व पुरष कामगारांना समान कामाकरिता समान रोजगार
- औषधे फवारणी करताना सुरक्षा गोष्टींचा वापर ( चश्मा, मास्क, गॉगल, ग्लोवज, apron इ.)
- महिलांच्या लैंगिक शोषणास प्रतिबंध

सदर घटकांच्या प्रशिक्षणामध्ये उपरोक्त मुद्द्यावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे अनिवार्य आहे.

४) तक्रार निवारण व्यवस्थापन:

प्रकल्पाच्या विविध घटकांची अंमलबजावणी करत असताना सहभागी विविध घटकांना वेगवेगळ्या टप्प्यावर येणाऱ्या अडचणींचे /तक्रारींचे पारदर्शक पद्धतीने, तटस्थपणे व विहीत वेळेत निराकरण करण्याकरीता प्रकल्पांतर्गत विशेष कार्यपध्दती तयार करण्यात आलेली आहे व ती खालील प्रमाणे आहे -

१. प्रकल्पाच्या सर्व स्तरावर (प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, विभागीय अंमलबजावणी कक्ष, जिल्हा अंमलबजावणी कक्ष) - तक्रार निवारण अधिकारी व आपिलीय अधिकारी यांचे नामनिर्देशन करण्यात आले आहे-.प्रपत्र ५ )
२. तक्रार सादर करण्याकरिता प्रकल्पाचा टोल फ्री नंबर - १८०० २१० १७७०
३. तक्रार सादर करण्याकरिता प्रकल्पाचा ई मेल आय डि - mahasmart.grm@gmail.com
४. तक्रार दाखल करण्याकरिता तक्रारकर्ता/कर्ती संबंधीत कार्यालयास लेखी तक्रार देवू शकतात अथवा उपरोक्त नमूद ई मेल आय डि वर तक्रार सादर करू शकतात अथवा टोल फ्री नंबर द्वारे तक्रार दाखल करू शकतात.
५. तक्रार कर्ता/ कर्ती हे प्रकल्पाच्या smart-mh.org ह्या संकेत स्थळावर आपली तक्रार नोंदवू शकतात.

६. तक्रार कर्त्याने / कर्तीने तक्रार सादर केल्याच्या दिनांकापासून तीन दिवसाच्या आत तक्रार प्राप्त झाल्याची पोचपावती संबंधीत कक्षामार्फत संबंधीतांना देणे अनिवार्य आहे.

७. प्रत्येक कक्षामार्फत तक्रार कर्त्याने दिलेली तक्रार गोपणीय ठेवणे बंधनकारक आहे.

८. प्रत्येक तक्रारीचे निराकरण हे तटस्थपणे कोणताही पूर्वग्रह न ठेवता करणे आवश्यक आहे.

९. प्रत्येक स्तरावर प्रकल्पाने ठरवून दिलेल्या विहीत वेळेत तक्रारींचे निराकरण करणे अनिवार्य आहे.

१०.प्राप्त सर्व तक्रारीची ( लिखित तक्रार व ई-मेल द्वारे) खालीलप्रमाणे **तक्रार निवारण रजिस्टरमध्ये नोंद घेणे अनिवार्य आहे.**

| अनु. क्र | नाव व पत्ता | तक्रारीचे स्वरूप | तक्रार प्राप्त दि | तक्रारीचा टोकन क्र | तक्रार करत्यास तक्रारीची पोच दिल्याचा दि | तक्रारीचे उत्तर दिल्याचा दि | तक्रार निवारण अधिकारी स्वाक्षरी | अपिलीय प्राधिकारी स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

११.दरमहा प्रकल्पाच्या MIS प्रणालीमध्ये याबाबत माहिती सादर करणे अनिवार्य आहे.

तक्रार निवारण अधिका-यांची जबाबदारी खालीलप्रमाणे आहे.

- कार्यालयात दर्शनीय ठिकाणी नोटिस बोर्डवर तक्रार निवारण अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे नाव, दूरध्वनी क्रमांक, भेटण्याची वेळ व ई-मेल आयडी (mahasmart.grm@gmail.com ) इ. तपशील नमूद करणे.
- तक्रार प्राप्त झालेल्या दिवसापासून ०३ दिवसाच्या आत तक्रारकर्त्यास/कर्तीस तक्रार प्राप्त झाल्याची लेखी/ई-मेलद्वारे पोच देणे (टोकन कम्प्लेंट नंबरसहीत).
- विहीत कालावधीत तक्रारीचे निवारण करणे.
- एखादया स्तरावर तक्रारीचे निराकरण होत नसल्यास संबंधित तक्रार निवारण अधिका-यांनी ती तक्रार पुढील स्तरावर अग्रेषित करणे. तसेच सदर माहिती संबंधित तक्रार कर्त्यास कळविणे.
- दरमहा प्रकल्पाच्या MIS प्रणालीमध्ये याबाबत माहिती सादर करणे.
- प्राप्त सर्व तक्रारींची ( लिखित तक्रार व ई-मेल द्वारे) तक्रार निवारण रजिस्टरमध्ये नोंद घेणे.

अपिलीय प्राधिकारी यांची जबाबदारी खालीलप्रमाणे आहे.

- सर्व तक्रारींचे विहीत वेळेत निवारण करण्याकरीता सनियंत्रण करणे.
- दरमहा प्रकल्पाच्या MIS प्रणालीमध्ये याबाबत माहिती सादर करण्याबाबत खातरजमा करणे.

**५) जेन्डर स्ट्रॅटजी:** प्रकल्पात महिलांच्या सहभागाबाबत खालीलप्रमाणे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले आहे.

**अ.** उपप्रकल्पात सहभागी होणाऱ्या एकूण समुदाय आधारित संस्थापैकी किमान ३० टक्के ह्या महिला संस्था असतील.

**ब.** प्रकल्पात सहभागी होणाऱ्या इतर समुदाय आधारित संस्थामध्ये किमान ३० टक्के महिला भागधारक व २० टक्के महिला संचालक असतील.

३० टक्के महिला शेतकरी उत्पादक संस्थेचे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता MAVIM व MSRLM ह्यांच्या मार्फत तयार झालेल्या बचत गटातील शेतकरी कुटुंबातील महिलांचा समावेश करून ४०० महिला शेतकरी संस्था ह्या MSRLM ह्या प्रकल्प अंमलबजावणी कक्षामार्फत तयार करण्यात येत आहेत. सदर संस्थांची क्षमता बांधणी करून त्यांना PP/MAP प्रकल्पात समविष्ट करून घेण्यात येणार आहे.

तसेच PP/MAP प्रकल्पात सहभागी होणाऱ्या इतर समुदाय आधारित संस्थानी ३० टक्के महिला भागधारक व २० टक्के महिला संचालकाचे उद्दिष्ट अनुदानाचा second tranche मिळण्यापूर्वी मिळण्यापूर्वी पूर्ण करणे बंधनकारक आहे.

उपरोक्त नमूद विविध घटकांच्या अनुषंगाने कोणताही उपप्रकल्प सुरू करण्यापूर्वी त्याची सामाजिक तपासणी ( social screening) करून सामाजिक कृती आराखडा ( Social Action Plan) तयार करून तो सविस्तर प्रकल्प अहवालात समविष्ट करणे गरजेचे आहे.

**सामाजिक तपासणी (Social Screening)**

Social Screening करण्याकरिता संबंधित अंमलबजावणी कक्षाच्या जिल्हास्तरीय अधिका-यांनी समुदाय आधारित संस्थेस भेट देऊन भागधारक व संचालकांशी चर्चा करणे तसेच निवडलेल्या जागेस भेट देऊन जागा मालकाशी चर्चा करुन सामाजिक तपासणी सुची प्रपत्र भरणे गरजेचे आहे. सामाजिक तपासणी सूची नमुना प्रपत्र ६ मध्ये जोडला आहे.

**सामाजिक कृती आराखडा (Social Action Plan)**

प्रत्येक सविस्तर अहवालामध्ये सामाजिक कृती आराखडा असणे आवश्यक आहे. हा सामाजिक कृती आराखडा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करीत असताना समुदाय आधारित संस्थांच्या किंवा संबंधितांच्या बरोबर चर्चा करुन , त्यांच्या गरजा व अडचणी लक्षात घेवून तसेच त्यांचे मत विचारात घेवून बनवणे गरजेचे आहे. सामाजिक कृती आराखडा प्रपत्र ७ मध्ये जोडला आहे.

प्रकल्पाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर घटकनिहाय प्रकल्प अंमलबजावणी कक्षांने करावयाची कार्यवाही :-

| घटक | उपक्रम | संबंधीत अंमलबजावणी कक्ष | अपेक्षित कार्यवाही | जबाबदारी | खात्री करून घेणारी यंत्रणा /अधिकारी | कालावधी/प्रकल्प टप्पा |
|---|---|---|---|---|---|---|
| ब. कृषी संलग्न व्यवसाय वृद्धीसाठी आणि व्यापक बाजारपेठ प्रवेशासाठी सहाय्य | ब.१ मूल्यसाखळी विकास शाळा | कृषि | सदर घटकाअंतर्गत दरवर्षी प्रशिक्षण, अभ्यासदौरे, प्रात्यक्षिकांचे नियोजन करत असताना प्रकल्पाच्या धोरणानुसार सामाजिक समावेशनाचे उद्दिष्टे ठेवण्यात यावे व ते पूर्ण करण्यात यावे. | जिल्हा नोडल अधिकारी | नोडल अधिकारी-Agri PIU<br>समाज विकास तज्ञ, विभागीय अंमलबजावणी कक्ष | अंमलबजावणी टप्पा |
| | ब. १.१,१.२,१.३ भागीदारी उपप्रकल्प, बाजार संपर्क वाढ उपप्रकल्प, पूरक व नावीन्यपूर्ण गुंतवणूक उपप्रकल्प | कृषि, पशुसंवर्धन, MSRLM, MAVIM, VSTF | सोशल स्क्रिनिंग | पुरवठा मूल्य साखळी तज्ञ-DIU व<br>AHD, MSRLM, MAVIM, VSTF PIU चे जिल्हास्तरावरील अधिकारी | जिल्हा पुरवठा मूल्य साखळी तज्ञ<br>AHD, MSRLM, MAVIM, VSTF PIU चे जिल्हास्तरावरील अधिकारी<br>समाज विकास तज्ञ , विभागीय अंमलबजावणी कक्ष | प्राथमिक मान्यतेनंतर अथवा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यापूर्वी |
| | | | सामाजिक कृती आराखडा तयार करणे व सविस्तर प्रकल्प अहवालात समविष्ट करणे | शेतकरी उत्पादक संस्था, प्रभाग संघ, लोकसंचलित साधन केन्द्र, प्राथमिक कृषी सहकारी संस्था | जिल्हा पुरवठा मूल्य साखळी तज्ञ<br>AHD, MSRLM, MAVIM, VSTF PIU चे जिल्हास्तरावरील अधिकारी<br>समाज विकास तज्ञ , विभागीय अंमलबजावणी कक्ष | सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करते वेळेस |
| | | | FPC, CLF, CMRC, PACS मार्फत सामाजिक कृती आराखडा अंमलबजावणी, Labour health & safety plan ची अंमलबजावणी | | | उपप्रकल्प अंमलबजावणी टप्पा |
| | | | सामाजिक कृती आराखडयानुसार social and gender inclusion targets पूर्ण करणे | | | अनुदानाचा दुसरा हप्ता अदा करण्यापूर्वी |

| घटक | उपक्रम | संबंधीत अंमलबजावणी कक्ष | अपेक्षित कार्यवाही | जबाबदारी | खात्री करून घेणारी यंत्रणा /अधिकारी | कालावधी/प्रकल्प टप्पा |
|---|---|---|---|---|---|---|
| | ब. १.४ (१ )<br>स्मार्ट कॉटन | कृषि | सदर घटकाअंतर्गत दरवर्षी प्रशिक्षण , अभ्यासदौरे , प्रात्यक्षिक, LRP निवड व LRP प्रशिक्षण या सर्व बाबींचे नियोजन करत असताना प्रकल्पाच्या धोरणानुसार सामाजिक समावेशन चे उद्दिष्टे ठेवण्यात यावे व ते पूर्ण करण्यात यावे. तसेच शेतकरी व LRP प्रशिक्षणामध्ये कामगार आरोग्य व सुरक्षा बाबत मार्गदशन करणे | Cotton Value Chain Expert/Supply Value Chain Expert-DIU of SMART Cotton districts | नोडल अधिकारी-Agri PIU<br>Cotton Value Chain Expert PIU-Agri<br>समाज विकास तज्ञ, विभागीय अंमलबजावणी कक्ष | अंमलबजावणी टप्पा |
| | १.४ (२ ) फळे व भाजी पाल्याकरीता प्रस्तावित निर्यात सुविधा- समुदाय आधारित संस्थांचे प्रशिक्षण | MSAMB | प्रशिक्षणाचे नियोजन करत असताना प्रकल्पाच्या धोरणानुसार सामाजिक समावेशनचे उद्दिष्ट ठेवण्यात यावे व ते पूर्ण करण्यात यावे | व्यवस्थापक | नोडल अधिकारी,<br>समाज विकास तज्ञ, विभागीय अंमलबजावणी कक्ष पुणे | अंमलबजावणी टप्पा |
| | | | सोशल स्क्रिनिंग | नोडल अधिकारी<br>समाज विकास तज्ञ, विभागीय अंमलबजावणी कक्ष पुणे | प्रमुख, पीआययु कक्ष<br>समाज विकास विशेषज्ञ - PCMU | Farmers Market करीता जागेची निवड केल्यानंतर |
| | | | सामाजिक कृती आराखडा तयार करणे व सविस्तर प्रकल्प अहवालात समविष्ट करणे | नोडल अधिकारी,<br>समाज विकास तज्ञ, विभागीय अंमलबजावणी कक्ष पुणे | प्रमुख, पीआययु कक्ष<br>समाज विकास विशेषज्ञ - PCMU | सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करत असताना |
| | १.४ (३) पशुसंवर्धन विभाग पशुसखी प्रशिक्षण | पशुसंवर्धन | प्रशिक्षणाचे नियोजन करत असताना प्रकल्पाच्या धोरणानुसार सामाजिक समावेशन चे उद्दिष्ट ठेवण्यात यावे व ते पूर्ण करण्यात यावे | नोडल अधिकारी<br>समाज विकास तज्ञ, विभागीय अंमलबजावणी कक्ष पुणे | प्रमुख, पीआययु कक्ष<br>समाज विकास विशेषज्ञ - PCMU | अंमलबजावणी टप्पा |
| | १.५<br>क्षमता बांधणी - Bridge Technical Support | MSRLM व MAVIM | महिलांच्या नवीन ४०० उत्पादक कंपनी तयार करत असताना त्यामध्ये प्रकल्पाच्या सामाजिक समावेशन धोरणानुसार अत्य व अत्यल्प भूधारक , SC , ST यांचा सहभाग घेण्यात यावा | नोडल अधिकारी | प्रमुख, पीआययु कक्ष | अंमलबजावणी टप्पा |

| घटक | उपक्रम | संबंधीत अंमलबजावणी कक्ष | अपेक्षित कार्यवाही | जबाबदारी | खात्री करून घेणारी यंत्रणा /अधिकारी | कालावधी/प्रकल्प टप्पा |
|---|---|---|---|---|---|---|
| | ब. ४ नागरी अन्न व्यवस्था पथदर्शी प्रकल्प- शेतकरी आठवडे बाजार | पुणे महानगरपालिका | सोशल स्क्रिनिंग | नोडल अधिकारी<br>समाज विकास तज्ञ, विभागीय अंमलबजावणी कक्ष पुणे | प्रमुख, पीआययु<br>समाज विकास विशेषज्ञ - PCMU | जागेची निवड केल्यानंतर |
| | | | सामाजिक कृती आराखडा तयार करणे व सविस्तर प्रकल्प अहवालात समविष्ट करणे | | | सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करत असताना |
| | | | प्रशिक्षणाचे नियोजन करत असताना प्रकल्पाच्या धोरणानुसार सामाजिक समावेशनचे उद्दिष्ट ठेवण्यात यावे व ते पूर्ण करण्यात यावे | नोडल अधिकारी | प्रमुख, पीआययु<br>समाज विकास तज्ञ, विभागीय अंमलबजावणी कक्ष पुणे | अंमलबजावणी टप्पा |
| क. जोखीम व्यवस्थापन यंत्रणा निर्मित्ती | धान्य गोदाम आधारित उपप्रकल्प | MSWC, MCDC, MAVIM, MSRLM | सोशल स्क्रिनिंग | सर्व संबंधित नोडल अधिकारी MSRLM, MAVIM, PIU चे जिल्हा- स्तरावरील अधिकारी<br><br>समाज विकास तज्ञ, विभागीय अंमलबजावणी कक्ष पुणे | प्रमुख, संबंधीत पीआययु<br>समाज विकास विशेषज्ञ, PCMU | जागेची निवड केल्यानंतर |
| | | | सामाजिक कृती आराखडा तयार करणे व सविस्तर प्रकल्प अहवालात समविष्ट करणे | | | सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करत असताना |
| | | | सामाजिक समावेशन- प्रशिक्षणामध्ये व गोदाम पावती मध्ये प्रकल्पांच्या सामाजिक समावेशन धोरणानुसार उदिदष्ट ठेवणे व ते पूर्ण करणे | | | अंमलबजावणी टप्पा |
| घटक ड .प्रकल्प व्यवस्थापन | तक्रार निवारण व्यवस्थापन | Agri, AHD, MSRLM, MAVIM, VSTF, MSAMB, DoM, MahaCot, MSWC, MSDC,PMC | दरमहा Monthly MIS मध्ये तक्रार निवारण तपशीलाची नोंद करणे | नोडल अधिकारी सर्व PIU<br>नोडल अधिकारी सर्व RIU<br>नोडल अधिकारी सर्व DIU<br>समाज विकास तज्ञ, विभागीय अंमलबजावणी कक्ष सर्व | प्रमुख, सर्व पीआययु<br>समाज विकास विशेषज्ञ , PCMU | अंमलबजावणी टप्पा |

# प्रपत्र –१

## LIST OF BLOCKS HAVING SCHEDULED AREA IN MAHARASHTRA

| Sr. No. | District | Full Scheduled Area | Partly Scheduled Area |
|---|---|---|---|
| 1 | Thane | 1.Shahapur | 1.Bhivandi<br>2.Murbad |
| 2 | Palghar | 1.Dahanu 2.Talasari<br>3.Mokhada 4.Jawhar<br>5.Wada 6.Vikaramgad | 1.Palghar<br>2.Vasai |
| 3 | Nashik | 1.Peth 2.Surgana<br>3.Kalwan | 1.Dindori<br>2.Egatpuri<br>3.Nashik 4.Baglan<br>5.Trimbakeshwar<br>6.Devala |
| 4 | Dhule | | 1.Saktri<br>2.Shirpur |
| 5 | Nandurbar | 1.Navapur 2.Taloda<br>3.Akkalkuwa4.Akrani | 1.Nandurbar<br>2.Shahda |
| 6 | Jalgaon | | 1.Chopda<br>2.Yaval<br>3.Raver |
| 7 | Ahmednagar | | 1.Akole |
| 8 | Pune | | 1.Ambegaon<br>2.Junnar |
| 9 | Nanded | | 1.Kinwat<br>2.Mahur |
| 10 | Yavatmal | | 1.Maregaon<br>2.Ralegaon<br>3.Kelapur<br>4.Ghatanji<br>5.Zari-jamani<br>6. Aarni |
| 11 | Amravati | 1.Chikhaldara2.Dharni | |
| 12 | Gadchiroli | 1.Etapalli<br>2.Sironcha<br>3.Aheri<br>4.Dhanora<br>5.Kurkheda<br>6.Bhamragad<br>7.Korchi | 1.Gadchiroli<br>2.Aarmori<br>3.Chamorshi<br>4.Mulchera<br>5.Desaiganj |
| 13 | Chandrapur | | 1.Rajura<br>2.Korpana<br>3.Jivti |
| Total Districts | | 13 | |
| Total Taluka | | 59 | |
| Total Grampanchayat | | 2872 | |
| Total Villages | | 5873 | |

# प्रपत्र –२

# ग्रामपंचायत ..........................

दि.  /  /२०२२

**प्रमाणपत्र**

प्रमाणीत करण्यात येते की, दिनांक......................... रोजी मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय ग्रामीण विकास (स्मार्ट) प्रकल्पातंर्गत, ................................................ ........... ........... ............समुदाय आधारीत संस्थेमार्फत गावामध्ये प्रकल्प राबविण्याकरीता बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये गावातील आदीवासी समुहातील............. संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या संस्थेमार्फत.......................................................... हा उपक्रम गावात राबविण्यात येणार असून त्याबाबत चर्चा करण्यात आली.

सदर उपक्रमाच्या माध्यमातून आदीवासी समुदायास कोणत्याही प्रकारची हानी पोहचणार नाही. या उपक्रमामुळे गावातील आदीवासी ग्रामस्थास (स्त्री व पुरुष) यांना रोजगार उपलब्ध होणार असून त्यांना या प्रकल्पाच्या विविध उपक्रमांचा फायदा मिळणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प गावात राबविण्याकरीता आदीवासी समुदायाची व ग्रामपंचायत यांची संमती देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| ग्रामसेवक यांचे नाव व स्वाक्षरी | सरपंच यांचे नाव व स्वाक्षरी |
| ....................................... | ....................................... |
| ....................................... | ....................................... |
| ....................................... | ....................................... |

सभेस उपस्थित आदिवासी  ग्रामस्थांची यादी          दि.  /  /२०२२

| अ.क्र. | नाव | महिला / पुरुष | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १) | | | |
| २) | | | |
| ३) | | | |
| ४) | | | |
| ५) | | | |
| ६) | | | |
| ७) | | | |
| ८) | | | |
| ९) | | | |
| १०) | | | |
| ११) | | | |
| १२) | | | |
| १३) | | | |
| १४) | | | |
| १५) | | | |
| १६) | | | |
| १७) | | | |
| १८) | | | |
| १९) | | | |
| २०) | | | |
| २१) | | | |
| २२) | | | |
| २३) | | | |
| २४) | | | |

# प्रपत्र -३

## जागा अतिक्रमण मुक्त असल्याचे प्रमाणपत्र

सबब प्रमाणपत्र देण्यात येते की, ----- ग्रामपंचायत कार्यालय हद्दीतील गट क्र. ---- पैकी ----- आर क्षेत्र ------------------------- यांनी भाडेपट्टा कराराद्वारे ---------------------यांना दिलेले आहे. सदरील जागेवर कंपनी मार्फत स्मार्ट प्रकल्पांअंतर्गत ----------------------------हे उपक्रम घेण्यात येणार आहे . सदरील जागा ही अतिक्रमणमुक्त असून सदर जागेवर कोणीही बेकायदेशीर घुसखोरी केलेली नाही. तसेच सदर जागेवर कोणतेही अधिकृत व अनधिकृत बांधकाम केलेले नाही.

दिनांक

नाव, सही व शिक्का

ग्रामपंचायत अधिकारी /संबंधीत अंमलबजावणी कक्षाचे जिल्हा अधिकारी

प्रपत्र –४

**ESHS compliance form ESHS (Environment, Social, Health and Safety)**

| A | Basic Information | |
|---|---|---|
| | **Particulars** | **Details** |
| 1 | Type of work | For example- Civil works, electrification, |
| 2 | Location | |
| 3 | Duration of work completion (months) | |
| 4 | Total no of labours to be deployed at work site | |
| 5 | No of labours to be hired from outside (Influx) | |
| 6 | No of local labours | |
| 7 | No of male labours | |
| 8 | No of female labours | |

**B. ESHS Plan**

| Sr. No. | Particulars | Description | Proposed work plan by Contractors |
|---|---|---|---|
| **1** | **Environmental Action Plan** | | |
| a | Water pollution | *For example-getting permission for Sourcing of water from community reservoirs, waste water management* | |
| b | Air & Noise pollution | *For example-Impose speed limits for Transport vehicles at village/site premises* | |
| **2** | **Social Action Plan** | | |
| a | **Labour Health & social compliance** | | |
| a.1 | In case of labour Influx | *For example- setup of camps- basic residence facilities, provision of clean drinking water, health and hygiene facilities, to conduct AIDS awareness campaigns, separate washrooms for male a& female, first aid kit, Provision of child crèches for women etc., provisions to restrict sexual harassment of women and child at construction site, mechanism to prevent child labour and bonded labour, etc.* | |

| Sr. No. | Particulars | Description | Proposed work plan by Contractors |
|---|---|---|---|
| a.2 | In case of local labours | *For example-Provision of Clean drinking water, separate washrooms for male a& female, first aid kit, provide child crèches for women etc., provision to restrict sexual harassment of women and child, mechanism to prevent child labour and bonded labour, etc.* | |
| **b.** | **Labour's Safety Measures** | | |
| | Safety Equipment | *For example-Provision of personal protection equipment (PPE) for workers, such as safety boots, helmets, masks, gloves, protective clothing, goggles, full-face eye shields, and ear protection, firefighting equipment* | |
| **c** | **Community Safety Measures** | | |
| C1 | Road Transport and Road Traffic Management | *For example-To provide signs at strategic locations of the roads, install and maintain a display board at each important road intersection on the roads to be used during construction, display boards about information regarding construction works as well as vehicle movements and warning signs etc.* | |

Signature

Name of Authorized Signatory................................

Bidder's Office Seal

प्रपत्र -५

## मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय ग्रामीण विकास (स्मार्ट) प्रकल्प, पुणे

## कामगार व्यवस्थापन नियोजन व अंमलबजावणी

समुदाय आधारीत संस्थेचे नाव ..........................................................तालुका................................ जिल्हा................................

उपक्रमांचे नाव ..............................................................कंत्राटदाराचे नाव..........................................................................

| अ. क्र. | कामगार स्त्रोत | | कामगार संख्या | | | | | | कामांचे एकुण दिवस | | | | | | प्रती दिन मजूरी (रुपये) | | | | | | बालकामगारांची संख्या | वेठबिगार संख्या | तक्रार निवारण व्यवस्थापन | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्थानिक | गाव / तालुका / जिल्हा / राज्याबाहेरील | पुरुष | | | महिला | | | पुरुष | | | महिला | | | पुरुष | | | महिला | | | | | कामगारांकडून प्राप्त तक्रारांची संख्या | कंत्राटदारा मार्फत कामगारांच्या तक्रार निवारण केलेली संख्या | कामगार आरोग्याच्या दृष्टीने कोणकोणत्या सेवा कंत्राटदारामार्फत कामगारांना पुरविण्यात आल्या | कामगार सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणकोणत्या सेवा कंत्राटदाराकडून कामगारांना पुरविण्यात आल्या | महिलांचा लैंगिक चळ प्रतिबंध करण्याकरीता कोणत्या उपाय योजना करण्यात आल्या ? |
| | | | कुशल | अकुशल | एकुण | कुशल | अकुशल | एकुण | कुशल | अकुशल | एकुण | कुशल | अकुशल | एकुण | कुशल | अकुशल | एकुण | कुशल | अकुशल | एकुण | | | | | | | |
| १ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

## सोशल स्क्रिनिंग चेकलीस्ट (तपासणी सूची)

समुदाय आधारीत संस्थेचे नाव -
उपप्रकल्प ठिकाण - जिल्हा/तालुका/ क्लस्टर -
संपूर्ण पत्ता व अक्षांश आणि रेखांश माहिती -

उप प्रकल्पाचे नाव-
उप प्रकल्पातील प्रस्तावित उपक्रम -

उप प्रकल्पातील पायाभूत सुविधेकरीता जागेची गरज (एकर मध्ये) -
तपशील-

| जागेचा वापर, पुनर्वसन आणि जागा संपादन व आदिवासी कार्यक्षेत्र याबाबत माहिती : | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | तपशील | होय | नाही | होय असल्यास तपशील द्यावा |
| १ | या उप-प्रकल्पांमधील उपक्रमांकरीता खाजगी जागा विकत घेणे प्रस्तावित आहे का? | | | |
| २ | या उपप्रकल्पांमधील- उपक्रमांकरीता ग्रामपंचायत अथवा शहरी स्थानिक संस्था यांच्या जागेचे हस्तांतरण प्रस्तावित आहे का? | | | |
| ३ | प्रस्तावित जागेवर अतिक्रमण नसल्याचे ग्रामपंचायत/संबंधित शासकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र घेतले आहे का? | | | |
| ४ | प्रस्तावित जागेवर कोणत्याही प्रकारची घुसखोरी झालेली नाही याबद्दल ग्रामपंचायत/संबंधित शासकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र घेतले आहे का? | | | |
| ५ | सदर जागेवर कायदेशीर व बेकायदेशीर स्थलांतरीत कराव्या लागणाऱ्या रचनांची (उपजीविकेचे साधन उदा.टपरी, दुकान इ.) संख्या? | | | |
| ६ | उपप्रकल्पांमधील उपक्रमामुळे स्थलांतरीत कराव्या लागणाऱ्या कुटुंबांची संख्या? | | | |
| ७ | उपप्रकल्पांमधील उपक्रमांकरीता सामूहीक मालमत्ता जसे की, गायरान जमिन, स्मशान भूमी/दफनभूमी इ. चे हस्तांतरण प्रस्तावित आहे का? | | | |
| ८ | उपप्रकल्पात निवडलेल्या जागेचा व आजूबाजूच्या जागेचा वापर कशाकरीता होतो ? (उदा. सामुदायिक सुविधा, शेती, पर्यटन, खाजगी मालमत्ता) | | | |
| ९ | उपप्रकल्पांमधील उपप्रकल्पामुळे खालील नमूद बाबींची कायमस्वरूपी किंवा तात्पुरती हानी होणार का?<br>पिके, फळझाडे,किरकोळ दुकाने, भाजीपाला/ मासे/मटण विक्री, सायकल दुरुस्ती दुकान, गॅरेज, चहाचे दुकान, गायरान जमीन, इ. | | | |
| १० | उप-प्रकल्पातील उपक्रमामुळे स्थानिक पातळीवरील लोकांना (महिला व पुरुष) रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे का? | | | |
| ११ | उप-प्रकल्पातील उपक्रमामुळे स्थानिक पातळीवर दारिद्रय निर्मूलनाचे लक्ष्य साध्य होण्यास मदत होणार आहे का? | | | |
| १२ | उप-प्रकल्प आराखडा नियोजनामध्ये व अंमलबजावणीमध्ये स्थानिक लोकांचा (महिला व पुरुष) यांचा पुरेसा सहभाग घेतला जाणार आहे का? | | | |
| १३ | उप-प्रकल्पाद्वारे लाभ मिळणाऱ्या लाभार्थ्यांची प्रस्तावित संख्या? | | | |
| १४ | उप-प्रकल्पाद्वारे लाभ मिळणाऱ्या महिलांची प्रस्तावित संख्या? | | | |
| १५ | उप-प्रकल्पाद्वारे लाभ मिळणाऱ्या वंचित कुटुंबे/ लाभार्थ्यांची प्रस्तावित संख्या? | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | उप-प्रकल्पाद्वारे लाभ मिळणाऱ्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबे/ लाभार्थ्यांची प्रस्तावित संख्या? | | | |
| १७ | उप-प्रकल्प क्षेत्र परिशिष्ट-v क्षेत्रातील ( आदिवासी जिल्हे व तालुके) आहे का[१]? | | | |
| अ | राष्ट्रीय व स्थानिक कायद्यानुसार/धोरणानुसार व मानववंश शास्त्राच्या अभ्यासानुसार उपप्रकल्पातील लोक/समूह "आदिवासी लोक/समूह/ डोंगराळ जमाती, अनुसूचीत जमाती" म्हणून ओळखले जातात का? | | | |
| ब | उपप्रकल्पातील हा समुदाय स्वत:ला प्रस्थापितापेक्षा भिन्न/वेगळया सामाजिक व सांस्कृतिक घटकाचा मानतो का? | | | |
| क | उपप्रकल्पातील हा समुदाय एकत्रपणे वेगळी वस्ती करुन राहतो का?/ वंशपंरपंरागत क्षेत्रात राहतात का? व नैसर्गिक संसाधने यांचेशी सामूहीक संलग्नता जोडून आहेत का? | | | |
| ड | उपप्रकल्पातील हा समुदाय प्रस्थापितापेक्षा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय पातळीवर वेगळेपणा राखून आहेत का? | | | |
| इ | उपप्रकल्पातील आदिवासी लोकांची बोलीभाषा प्रस्थापितापेक्षा वेगळी आहे का? | | | |
| ई | उपप्रकल्पातील हा समुदाय ऐतिहासिकदृष्ट्या, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या उपेक्षित, वंचित, वगळले गेले आहेत आणि / किंवा त्यांच्याशी भेदभाव केला गेला आहे असा आहे का? | | | |
| १८ | उपप्रकल्पातील हया प्रकारचा समुदाय "आदिवासी लोक/समूह" म्हणून कोणत्याही राष्ट्रीय अथवा स्थानिक पातळीवरील निर्णय प्रक्रियेसंबंधी गठीत औपचारीक समितीमध्ये प्रतिनिधित्व करतो का? | | | |
| १९ | उप-प्रकल्पांमार्फत सदर आदिवासी समुदायाला अप्रत्यक्ष अथवा प्रत्यक्ष लाभ होणार आहे का? | | | |
| २० | उप-प्रकल्पातील उपक्रमामुळे आदिवासी लोकांच्या रुढी व पारंपरिक तसेच सामाजिक संस्कृतीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे परिणाम होणार आहे का? (उदा. बालसंगोपन, शिक्षण, आरोग्य, कला इ.) | | | |
| २१ | या उप-प्रकल्पातील उपक्रमामुळे आदिवासींच्या उदरनिर्वाह तसेच जीवनमान प्रणालीवर परिणाम होणार आहे का? (उदा.अन्न उत्पादन प्रणाली, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, हस्तकला आणि व्यापार, रोजगाराची स्थिती) | | | |
| २२ | उप-प्रकल्प हा आदिवासी लोकांच्या ताब्यात असलेल्या व त्यांच्या मालकीच्या व वापरात असलेल्या जागेमध्ये आहे का? | | | |

सत्यता पडताळणी व प्रमाणित अधिकारी -
जिल्हा नोडल अधिकारी/प्रकल्प अंमलबजावणी कक्ष अधिकारी/विभागीय कक्ष अंमलबजावणी अधिकारी

अधिकाऱ्याचे नाव :

पदनाम:

कार्यालयाचे नाव :

दिनांक

स्वाक्षरी

---

*1आदिवासी जिल्हे व तालुके यांची यादी पुढील संकेतस्थळावर उपलब्ध -*
https://cdnbbsr.s3waas.gov.in/s3c8758b517083196f05ac29810b924aca/uploads/2019/11/2019112132.pdf

# प्रपत्र –७

## सामाजिक कृती आराखडा

१. सामाजिक कृती आराखडा अंमलबजावणीकरीता जबाबदार व्यक्तीचे नाव –

| तपशील | होय/ नाही | ( होय असल्यास माहिती नमूद करा) |
|---|---|---|
| २. **उप-प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्राची माहिती** | | |
| उप-प्रकल्प क्षेत्र अनुसूचित *Schedule V*[2] (आदिवासी) क्षेत्रामध्ये आहे का? | | |
| उप-प्रकल्पांमध्ये विशेषतः असुरक्षित आदिवासी गट (Particularly Vulnerable Tribal Groups) आहेत का?[3] | | |
| उप-प्रकल्प क्षेत्र डावे विंग अतिरेकी[४]/नक्षलवादी (Left Wing Extremism) क्षेत्रामध्ये येते का? | | |
| उप-प्रकल्प क्षेत्र आकांक्षी जिल्हा (Aspirational District) अंतर्गत येते का?[५] | | |
| ३. **नकारात्मक यादीचे अनुपालन** (Compliance with Negative List) | | |
| या उप-प्रकल्पांमधील उपक्रमांकरीता खाजगी जागा ताब्यात घेणे अनिवार्य आहे का? | | |
| या उप-प्रकल्पांमधील उपक्रमांकरीता खाजगी जागा विकत घेतली जाणार आहे का? | | |
| या उप-प्रकल्पांतील उपक्रमांमुळे लोकांचे तसेच घरे, दुकाने, इमारती, इ.चे स्थलांतरण होणार आहे का? | | |
| या उप-प्रकल्पांतील उपक्रमांमुळे सामान्य मार्ग, सुविधा व संसाधने वापरण्याची संधी बंद होणार आहे का? | | |
| या उप-प्रकल्पांतील उपक्रमांमुळे स्थानिक उदरनिर्वाह व व्यवसायांवर विपरित परिणाम होणार आहे का? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये Schedule V (अनुसूचित जमातीची लोकसंख्या असलेली) क्षेत्रातील गावामध्ये आदिवासी समाजाला प्रकल्पाची माहिती देण्याकरीता पुर्वसूचना देवून विनाशुल्क चर्चा केली नाही असे आहे का? | | |
| या उप प्रकल्पांमध्ये Schedule V (अनुसूचित जमातीची लोकसंख्या असलेली) क्षेत्रातील अशी गावे आहेत का जेथे आदिवासी समाजाची व्यापक स्तरावर प्रकल्प अंमलबजावणी करीता संमती मिळाली नाही? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये अशा कोणत्याही उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामुळे आदिवासी समाजाचे सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक श्रद्धा, प्रथा आणि त्यांच्या उदरनिर्वाहावर नकारात्मक परिणाम होऊ शकेल? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये अशा उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामुळे पुरातत्व, ऐतिहासिक व सांस्कृतिक मालमत्तेवर विपरित परिणाम होऊ शकेल? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये अशा उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामध्ये बाल कामगार,[६] वेठबिगार[७] किंवा इतर कामगारांचे शोषण करण्याच्या पध्दतीचा अवलंब असेल? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये खोल खोदकाम कामे, घातक रसायने, स्फोटके, धोकादायक स्थळे संबंधित उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामुळे कामगार आणि स्थानिक समुदायांचे आरोग्य आणि सुरक्षितता धोक्यात येईल? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये बांधकाम किंवा प्रकल्प् अंमलबजावणीदरम्यान कामगाराकरीता काही धोकादायक कामांचा समावेश आहे का? | | |
| या उप-प्रकल्पांमध्ये अशा उपक्रमांचा समावेश आहे का ज्यामुळे महिला, मुले आणि मुली यांचे हित, आरोग्य व सुरक्षा यांस हानी पोहोचेल? | | |
| ४. **उपप्रकल्प अंमलबजावणी** | | |
| **४.१ उप-प्रकल्पांमध्ये वंचित घटकांचा समावेश** | | |
| उप-प्रकल्पांमध्ये वंचित शेतकरी कुटंब, (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला प्रधान कुटुंब, इ.) वंचित कामगार, भाडेतत्वावर शेती करणारे कुटुंब, परत आलेले स्थलांतरीत कुटुंब इ. यांना समाविष्ट करुन घेण्याकरीता विशेष प्रयत्न प्रस्तावित आहेत का? | | |

---

[2] *Schedule V जिल्हा- ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, यवतमाळ, अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर.*

[3] *असुरक्षित आदिवासी गट- कटकारिया (कठोडिया), कोलम, मारिया गोंड*

[4] *डावे विंग अतिरेकी[४]/नक्षलवादी क्षेत्र – चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया*

[5] *आकांक्षी जिल्हे- नंदुरबार, वाशिम, गडचिरोली, उस्मानाबाद*

[6] *14 वर्षाखालील बालकांना बालकामगार असे संबोधले जाते.*

[7] *वेठबिगार :निराधार, दुर्बल, परावलंबी व असंघटित व्यक्तींच्या अज्ञानाचा व दुबळेपणाचा गैरफायदा उठवून, त्यांना अंकित करुन, त्यांच्या इच्छेविरुध्द सक्तीने व योग्य मोबदला न देता किंवा विनामोबदला पडेल त्या कामाकरिता राबवून घेणे म्हणजे वेठबिगार.*

| | | |
|---|---|---|
| ४.२ **आदिवासी क्षेत्रातील उपप्रकल्प** | | |
| आदिवासी समुदायाला उपप्रकल्पाची माहिती देण्याकरीता पूर्वसूचना देवून मोफत मार्गदर्शन केले आहे का? | | |
| उपप्रकल्प अंमलबजावणीसाठी आदिवासी समुदायाची संमती प्राप्त झाली आहे का? | | |
| उपप्रकल्पाचे फायदे आदिवासी समुदायापर्यंत पोहोचतील याची खातरजमा केली जाणार का? | | |
| ४.३ **जमिन** | | |
| ७/१२ चा उतारा किंवा खासगी जमीन २९ वर्षांकरीता भाड्याने लीज/वर घेतल्याचा नोंदणीकृत भाडेकरार सोबत जोडला आहे का? | | |
| जागेचे अतिक्रमण नसलेले संबंधित अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे का? . (जिल्हा अंमलबजावणी यंत्रणा प्रमुख /ग्रामपंचायत / तलाठी इ. संबंधित) | | |
| ४.४ **पायाभूत सुविधा** | | |
| कामगारांच्या आरोग्य आणि सुरक्षा सुविधां करीता काही उपाययोजना प्रस्तावित आहे का? (कामगार शिबिरादरम्यान ) {उदा. राहण्यासाठी पुरेशी जागा, स्वच्छता सुविधा, पिण्याचे पाणी, पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र स्वक्षतागृहे, मुलांसाठी पाळणाघर/स्वतंत्र शेड, महिलांच्या लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३) संदर्भात माहिती देणे/जागरुकता आणणे. } | | |
| बाहेरून येणाऱ्या कामगारांमुळे नि र्माण झालेल्या जोखीमा टाळण्याकरीता उपाययोजना प्रस्तावित आहे का? (उदा. गुन्हे, संसर्गजन्य आजार, लिंग आधारीत हिंसाचार, बालकामगार, इ. रोखण्याकरीता उपाययोजना) | | |
| लिंग-आधारित हिंसा व लैंगिक छळ रोखण्याकरीता उपाययोजना प्रस्तावित आहेत का? (उदा अंतर्गत समितीची स्थापना) | | |
| ४.५ **कामगार व समुदाय आरोग्य आणि सुरक्षा** | | |
| समुदाय आरोग्य आणि सुरक्षा यावर काही उपाययोजना प्रस्तावित आहेत का? (उदा. शारीरिक इजा, अपघात, लैंगिक छळ, इ. रोखण्याकरीता उपाययोजना) | | |
| कामगार आरोग्य आणि सुरक्षा यावर काही उपाययोजना प्रस्तावित आहेत का? ? (उदा. कामाच्या ठिकाणी अपघात,शारीरिक इजा, लैंगिक छळ, इ. रोखण्याकरीता उपाययोजना) | | |
| कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सुरक्षा उपाययोजना प्रस्तावित आहेत का? (उदा. सुरक्षित अंतर, मास्कचा वापर, इ.) | | |

५. उप-प्रकल्प उद्दीष्टय :

| **अ. क्र** | **तपशील** | समुदाय आधारित संस्थेची सद्यस्थिती | उप-प्रकल्पाचे उद्दीष्टय |
|---|---|---|---|
| | **उपप्रकल्पांमध्ये विविध घटकांचा समावेश** [8] | | |
| i | **एकूण शेतकरी/सदस्य संख्या** | | |
| ii | **अत्य व अत्यल्प भूधारक शेतकरी संख्या (व टक्केवारी)** | | |
| iii | महिला भागधारक **संख्या (व टक्केवारी)** | | |
| iv | महिला संचालक **संख्या (व टक्केवारी)** | | |
| v | अनुसूचित जाती **सदस्य संख्या (व टक्केवारी)** | | |
| vi | अनुसूचित जमाती **सदस्य संख्या (व टक्केवारी)** | | |
| vii | भाडेतत्वावर शेती करणारे **सदस्य** संख्या (**व टक्केवारी**) | | |
| vii | भूमिहीन **सदस्य** संख्या (**व टक्केवारी**) | | |
| ix | ७/१२ नावावर असणाऱ्या महिलांची संख्या (**व टक्केवारी**) | | |

*8 प्रकल्पाच्या सामाजिक विकास धोरणानुसार प्रकल्प अखेरीस प्रकल्पातील एकूण लाभार्थ्यांपैकी 80% अत्य व अत्यल्प भूधारक शेतकरी, किमान 30% महिला लाभार्थी, किमान 6% अनुसूचित जमाती, किमान 7% अनुसूचित जाती, तसेच समुदाय आधारित संस्थांमध्ये किमान 20% महिला संचालक लाभार्थी अनिवार्य आहे. .*